नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/10/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील मानवशक्ती ले आउट अनुप सेलीब्रेशन लॉन समोर उमरेड येथे दिनांक 14/10/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 15/10/2021 चे 09.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीमती वच्छलाबाई शामरावजी बोरकर वय 30 वर्षे रा. मानवशक्ती ले आउट अनुप सेलीब्रेशन लॉन समोर उमरेड ता, उमरेड जि, नागपूर या मुलीकडे नागपूर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमीत्य गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचा कोंडा तोडुन बेडरूम मधील आलमारीतील सोन्याचे दागीने 60,000/–रू. व नगदी 14,000/–रू. असा एकुण कि. 74,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री राजेश पाटील मो.क्र. 9049989341 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील मौजा पवनी शिवार एन एच 44 हायवेरोड येथे दि. 15/10/2021 चे 10.00 वा. ते 10.30 वा. दरम्यान मुस्ताक अहमद मो. अयुम अन्सारी (मृतक), वय 40 वर्ष रा. कामठी व मुस्ताक खान मुस्ताकिम खान (जखमी), वय 45 वर्ष रा. कामठी हे कामठी हे दोघेही आपले एम.एच–40/व्हि– 9411 क्रमांकाच्या मोटरसायकलने आईला भेटण्यासाठी शिवनी येथे जात होते. त्यादरम्यान पवनी शिवार एन एच 44 रोडवर मागुन येणा–या अज्ञात कंटेनर चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटर सायकल स्वारास मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकलवर मागे बसलेला मृतक याचे मरण्यास व जख्मी नामे मुस्ताक खान मुस्ताकिम खान (जखमी), वय 45 वर्ष रा. कामठी यास जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक विजय परमेश्वरे पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि लक्ष्मी घोंडके मो.नं. 8830614950 या करीत आहे.

## प्राणांकित अपघातात

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत मांडवा ता. भिवापुर येथे दि. 13/10/2021 चे 18.00 वा. दरम्यान खबर देणार नामे– सुनिल वंसता येलमुले वय 32 वर्ष रा. मांडवा सोमनाळा यांच्या रिपोर्ट वरून पोस्टे भिवापुर येथे मर्ग क्र. 29/2021 कलम 174 जा फौ दि. 14/10/2021 रोजी दाखल असुन मर्ग चौकशी दरम्यान असे निष्पन्न झाले की, 'यातील मृतक नामे– स्नेहल सुनिल येलमुले वय 11 वर्ष रा. मांडवा सोमनाडा ता. भिवापूर यास जाणीव असुन सुद्धा हयगयीने विद्युत प्रवाहाचा तारेवरती वायराचा हुक तयार करून विज चोरी करून पथ दिवे सुरू करण्याचा प्रयत्न केला प्रयत्नामध्ये मृतक यास शॉक लागला व स्वताच्या मरणास तो कारणीभुत झाल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाल्याने चौकशी अहवालानुसार सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेंद्र डहाके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 135(क) विद्युत कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री एस एस भस्मे मो.न. 9764946808 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर